Dr. Abhinandan Ravsaheb Patil, School of Pharmaceutical Sciences, Sanjay Ghodawat University, Kolhapur

## World Record Achievment

हॅलो प्रभात

# घोडावत विद्यापीठाच्या डॉ. अभिनंदन पाटील यांची वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

संजय घोडावत विद्यापीठाच्या फार्मसी विभागाचे सहयोगी प्रा. डॉ. अभिनंदन पाटील यांनी संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत पदवी, पदव्युत्तर आणि पीएच.डी मध्ये सुवर्णपदक पटकावले. याची दखल इंटरनॅशनल बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने घेऊन त्यांना वैद्यकीय आणि औषध निर्माणशास्त्रामध्ये सुवर्ण पदकांची हॅट्रीक करणारा जागतिक पातळीवरील संशोधक म्हणून गौरव केला आहे. तर इंडिया बुक ऑफ रेकॉर्डसनेही डॉ. अभिनंदन पाटील यांच्या यशाचं कौतुक करून इंडिया बुक ऑफ रेकॉड्र्समध्ये नोंद केली आहे.



प्रा. डॉ. अभिनंदन पाटील यांनी औषध निर्माण शास्त्रामध्ये उल्लेखनीय अशी कामगिरी केली आहे. त्यांनी कॅन्सर सारख्या भयंकर आजारावर योग्य औषध मिळावित यासाठी आपल्या संशोधनावर भर देऊन त्यांनी त्यावरील संशोधन केले. २०११ साली पदवीच्या अभ्यासक्रमात त्यांनी शिवाजी विद्यापीठात सुवर्णपदक पटकावले, त्यानंतर २०१३ मध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमातही सुवर्ण पदक पटकावले.

डॉ. अभिनंदन पाटील यांनी २००७ सालापासूनच संशोधनावर भर देऊन औषधनिर्माण शास्त्रातील आपला संशोधन प्रकल्प आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर केला. याची दखल जपानमधील टोकियो विद्यापीठाने घेऊन २०१२ साली त्यांचा यंग सायंटिस्ट म्हणून गौरव केला. त्यानंतर २०१३ साली कॅन्सरवरील संशोधनाबद्दल आंध्रप्रदेश सरकारनेही यंग सायंटिस्ट म्हणून गौरविले. त्याचबरोबर २०१२ साली तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते आदर्श विद्यार्थी म्हणून डॉ अभिनंदन पाटील यांना गौरविण्यात आले होते.

या यशाबद्दल विद्यापीठाचे अध्यक्ष श्री. संजयजी घोडावत, विश्वस्त श्री. विनायक भोसले, कुलगुरू डॉ. अरुण पाटील, कुलसचिव विंग कमांडर (से. नि.) डॉ.संदीप सिंग, संचालक डॉ. व्ही.व्ही.कुलकर्णी, अकॅडमिक डीन डॉ.उत्तम जाधव, स्कुल ऑफ फार्मसी विभागाचे डीन डॉ. श्रीनाथ यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

Dr. Abhinandan Ravsaheb Patil, School of Pharmaceutical Sciences, Sanjay Ghodawat University, Kolhapur

## Australian Patent Granted

### घोडावत विद्यापीठाच्या डॉ.अभिनंदन पाटील यांना ऑस्ट्रेलियन पेटंट

**जयसिंगपूर/प्रतिनिधी–**



संजय घोडावत विद्यापीठाच्या स्कुल ऑफ फार्मसी विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.अभिनंदन पाटील यांना ऑस्ट्रेलियन पेटंट मिळाले आहे. जखम भरून येण्यासाठी सिल्क फायबरचा उपयोग करून नॅनोड्रेसिंग मटेरियल त्यांनी तयार केले आहे. या संशोधनाची जागतिक पातळीवर दखल घेऊन हे संशोधन ऑस्ट्रेलियाच्या इनोव्हेशन युटिलिटी पेटंट म्हणून प्रसिद्ध झाले आहे. डॉ. अभिनंदन पाटील यांनी मिळविलेल्या या आंतरराष्ट्रीय बहुमानाबद्दल संजय घोडावत विद्यापीठाचे विश्वस्त विनायक भोसले व कुलगुरु डॉ.अरुण पाटील यांनी त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले आहे. डॉ.अभिनंदन पाटील म्हणाले, कोणत्याही जखमेला ड्रेसिंग केले तर दर दोन दिवसांनी ते ड्रेसिंग बदलावे लागते परंतु आम्ही तयार केलेल्या नॅनो ड्रेसिंग मुळे एकदा केलेले ड्रेसिंग जखम पूर्ण बरी झाल्यावरच काढू शकतो. हे ड्रेसिंग मटेरियल तयार करण्यासाठी झिंक ऑक्साईड नॅनोपार्टिकल चा उपयोग करण्यात आला आहे. हे मटेरियल अँटीबॅक्टेरियल म्हणून काम करते त्यामुळे जखम लवकर बरी होण्यास मदत होते. हे ड्रेसिंग मटेरियल प्लास्टिक च्या पातळ थरासारखे दिसत असून बँडेज लावले गेले आहे असा पेशंट ला भास देखील जाणवत नाही.'' या यशाबद्दल स्कुल ऑफ फार्मसी विभागाचे अधिष्ठाता डॉ.श्रीनाथ यांनी त्यांचे अभिनंदन केले. या यशाबद्दल संजय घोडावत विद्यापीठाचे अध्यक्ष संजय घोडावत, विश्वस्त विनायक भोसले, कुलगुरू डॉ. अरुण पाटील, कुलसचिव डॉ.एन.के. पाटील, संचालक डॉ.व्ही.व्ही.कुलकर्णी, अकॅडमिक डीन डॉ.उत्तम जाधव यांनी त्यांचे अभिनंदन केले.

School of Pharmaceutical Sciences, Sanjay Ghodawat University, Kolhapur

## Certificate of Excellence



makeintern .com

Entrepreneurship Cell IIT Kharagpur

E-Cell-IIT Kharagpur

in association with www.makeintern.com

Certificate of Excellence

Presented To

School of Pharmaceutical Sciences, Sanjay Ghodawat University, Kolhapur

In recognition for being Zonal Center for Program on Basic Techniques in Molecular Biology by Makeintern Championship & E-Cell IIT Kharagpur held form 27th May to 5th June 2021.

(Hardeep Singh Puri)
Director
Makeintern.com